**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue-141 (Indexed) Aug. 2022 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या निर्मितीच्या कारणांचा अभ्यास

**प्रा. भगवंत बोकडे**
समाजशास्त्र विभाग,
राजर्षी शाहू महाविद्यालय स्वायत्त, लातूर

**प्रा. डॉ. बी. आर. भोसले**
समाजशास्त्र विभाग,
यशवंत महाविद्यालय, नांदेड

**गोषवारा:–**

व्यक्तीच्या एकूण आयुष्यातील शेवटची अवस्था म्हणजे ज्येष्ठता होय. या अवस्थेत व्यक्तीच्या विविध अवयवांची कार्यक्षमता कमी कमी होत जाते. सामाजिक वचनबद्धते पासून ते वेगळे होतात. पूर्वी वृद्ध व्यक्तीकडे दुर्लक्ष केले जात होते. आजही त्यात विशेष बदल झालेला नाही. त्यांच्यासाठी आज 'ज्येष्ठ नागरिक' हा शब्दप्रयोग वापरला जातो. पूर्वी थेरडा, म्हातारा असा शब्दप्रयोग केला जात होता. प्राचीन काळातील भारतीय कुटुंब संस्थेमध्ये ज्येष्ठांचे स्थान महत्त्वपूर्ण होते. कुटुंबाची पूर्ण सत्ता त्यांच्याच हाती होती. कुटुंब प्रमुख म्हणून निर्णय घेण्याचे तसेच महत्त्वाची कार्य त्यांच्याच मार्गदर्शनाखाली होत असत. परंतु सद्यस्थितीमध्ये मात्र खूप मोठे परिवर्तन झालेले दिसून येत आहे. ज्येष्ठांचे कुटुंबातील स्थान दिवसेंदिवस कमी होत आहे त्यांच्या समस्या वाढत आहेत. पूर्वी सयुक्त कुटुंबपद्धती होती. त्यावेळी ज्येष्ठांना कुटुंब संस्थेमध्ये सर्वश्रेष्ठ दर्जा होता. परंतु सद्यस्थितीमध्ये मात्र ज्येष्ठ नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, आरोग्य विषयक अशा अनेक समस्यांचा समावेश होतो. या समस्या ज्येष्ठ नागरिकांना उर्वरित आयुष्य जगण्यासाठी अडथळा निर्माण करतात. या समस्या सोडविण्याबरोबरच समस्या निर्मितीच्या मूळ कारणांचा शोध घेऊन उपाययोजना करणे आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या निर्मितीपाठीमागे अनेक कारणे आहेत. जसे की, संयुक्त कुटुंबपद्धतीचा ऱ्हास, जातिप्रथेचा ऱ्हास, औद्योगिकीकरण व नागरीकरण, दर्जाचे बदलले निकष, जोडीदारांचे निधन, आर्थिक परावलंबन, राहत्या घराची कमतरता, नोकरी करणाऱ्या महिलांचे वाढते प्रमाण, ग्रामीण समुदायातील परिवर्तन, नैतिक मूल्यांचा ऱ्हास इत्यादीचा समावेश यामध्ये होतो. या कारणामुळेच ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांमध्ये वाढ होत असलेली दिसून येते.

**की–वर्ड :–**

ज्येष्ठता,संयुक्त कुटुंबपद्धती, जातीव्यवस्था, सामाजिक समस्या, वृद्धत्व, औद्योगीकरण, नागरीकरण, दर्जा, परावलंबन, नैतिक मूल्य.

**प्रस्तावना :–**

ज्येष्ठ नागरिक हा समाजाकडून दुर्लक्षित वर्ग बनत चाललेला आहे. त्याची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचबरोबर त्यांच्या समस्यांमध्ये सातत्याने भर पडत आहे. पूर्वी ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांना फार समस्या नव्हत्या. परंतु आज प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांना अनेक विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे ही एक मोठी सामाजिक समस्या बनली आहे. ज्येष्ठ नागरिकांची ही बिकट परिस्थिती निर्मितीसाठी फक्त तरुण वर्ग जबाबदार आहे असेही



Scanned by CamScanner

Special Issue-141 (Indexed) Aug. 2022 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

म्हणता येणार नाही. त्यासाठी अनेक कारणे जबाबदार आहेत. ज्येष्ठ नागरिक समस्या निर्मिती पाठीमागील करणाचा शोध पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:–**

1. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या निर्मितीमागील कारणे अभ्यासणे.
2. ज्येष्ठ नागरिकांचा बदलता दर्जा अभ्यासणे.
3. ज्येष्ठ नागरिकांची सद्यस्थिती अभ्यासणे.

**संशोधन पध्दती:–**

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीतील अनुसूची व दुय्यम तथ्य संकलन पद्धतीतील विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र, इंटरनेट, इत्यादी साधनांचा आधार घेतला आहे.

- **जेष्ठ नागरिकांच्या समस्या निर्मिती पाठीमागील कारणे:–**

**१. संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास:–**

भारतीय समाजात मध्ययुगीन काळामध्ये पारंपारिक संयुक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. तिचे अस्तित्व सद्या संपत आहे. या कुटुंबपद्धतीमध्ये नातेसंबंधाला विशेष महत्व होते. ज्येष्ठ मंडळीकडे आदराच्या, सन्मानाच्या, भावनेने पाहिले जात होते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना कोणत्याही समस्या नव्हत्या. एवढेच नव्हे तर घरातील कुटुंबप्रमुख ज्येष्ठ नागरिकच असत. त्यामुळे त्यांनी केलेल्या नियोजनानुसार संपूर्ण कुटुंब चालत असे.[1] मात्र आज या परिस्थितीत प्रचंड बदल झालेला आहे. संयुक्त कुटुंबपद्धती ऐवजी विभक्त कुटुंबपद्धती वाढत आहे. नोकरी, व्यवसाय यानिमित्ताने एकत्र कुटुंबातून मुलांचे स्थलांतर होत आहे. केवळ स्वतःचा विचार करून ती मुले स्वतंत्र राहू लागली आहेत. परिणामी ज्येष्ठ नागरिकांचे जीवन एकाकी बनत चालले आहे. म्हणून संयुक्त कुटुंबपद्धतीचा ऱ्हास हे एक ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या निर्मितीमागील कारण सांगता येईल.

**२. जातीप्रथेचा ऱ्हास:–**

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जातीसंस्थेचे अस्तित्व प्राचीन काळापासून आहे. या संस्थेचे महत्त्व मानवी जीवनामध्ये अनन्यसाधारण मानले होते. परंतु काळानुसार या संस्थेमध्ये अनेक परिवर्तने झाली आहेत. पूर्वी जी कठोर बंधने जातिव्यवस्थेने घालून दिली होती ती आज शिथील झाली आहेत. आज समाजामध्ये जातीसंस्थेचे महत्त्व कमी झालेले दिसून येते. पूर्वी जातीअंतर्गत विवाह करणे बंधनकारक होते. आज जातीबाह्य/आंतरजातीय विवाहाला कायद्याने मान्यता दिली आहे. जाती संस्थेमध्ये श्रेष्ठ–कनिष्ठता, स्पृश्य–अस्पृश्यता हा भेदभाव कमी झाला आहे. समतेच्या मूल्याचा विकास झाला आहे. परंतु जाती संस्थेची कडक बंधने कमी होण्यामुळे समाजावर दुष्परिणामही झाले आहेत. पूर्वी जाती संस्थेमुळे जात पंचायतीच्या माध्यमातून व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण प्रस्थापित केले जात होते. म्हणजेच एखाद्या कुटुंबामध्ये ज्येष्ठ नागरिकाना त्रास दिला जात असेल किंवा त्याचा सांभाळ केला जात नसेल तर त्या कुटुंबातील सदस्यांना जाती पंचायतीकडून कठोर शिक्षा केली जात असे.[2] परंतु सद्यस्थितीमध्ये जाती संस्थेवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण राहिलेले नाही. ते स्वतःच्या मर्जीप्रमाणे वर्तन करत आहेत. परिणामी ज्येष्ठ



Scanned by CamScanner

Special Issue-141 (Indexed) Aug. 2022 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

नागरिकांकडे दुर्लक्ष होत आहे. म्हणून जातीप्रथेचा ऱ्हास हे एक ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या निर्मितीचे कारण ठरत आहे.

**३. औद्योगीकरण व नागरीकरण:–**

ब्रिटिशांच्या आगमनाने भारतात औद्योगिकीकरणाला चालना मिळाली. ही औद्योगीकरण प्रक्रिया खूप वेगाने घडून आली. यासाठी कामगारवर्ग ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे स्थलांतरित झाला. त्यामुळे ग्रामीण भागातील कुटुंबाचे विभाजन होऊ लागले.[३] ग्रामीण लोकांच्या स्थलांतरामुळे नगरांची लोकसंख्या वाढू लागली. कामासाठी, नोकरीसाठी, उद्योगासाठी ग्रामीण तरूण शहरात स्थायिक झाल्यामुळे ग्रामीण ज्येष्ठ नागरिकांच्या समस्याची निर्मिती होऊ लागली. पुढे नागरिकरणामुळे महागाई वाढली. तेव्हा कुटुंबातील स्त्रियांनासुद्धा कामाच्या निमित्ताने घराबाहेर पडावे लागले. त्याचा परिणाम नागरी भागातील ज्येष्ठ नागरिकावर झाला. या ज्येष्ठांची काळजी घेण्यासाठी घरात कोणीही राहिले नाही. कित्येक कुटुबीयांना घरामध्ये ज्येष्ठ नसावेत असे वाटू लागले. ज्या मुलांना जीवापाड सांभाळले तीच मुलं ज्येष्ठांना त्रास देऊ लागली. त्यांना घराबाहेर काढू लागली. त्यामुळे त्यांना समायोजन करणे अशक्य झाले. ज्येष्ठांचा रिकामा वेळ निघून जाणे कठीण बनले. कित्येक दिवस ज्येष्ठ नागरिक हे फक्त घर सांभाळणारे व्यक्ती आहेत या भावनेतून त्यांच्याकडे नोकरी करणारी स्त्री पाहू लागली. त्याचबरोबर ज्येष्ठांना मुलांचा सांभाळ करणे, त्यांना शाळेत घेऊन जाणे, घेऊन येणे, घराकडे लक्ष ठेवणे अशा प्रकारची कामे करावी लागत असतात. थोडक्यात औद्योगीकरण व नागरीकरणामुळे ग्रामीण व शहरी भागातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या मध्ये प्रचंड वाढझालेली आहे. म्हणून औद्योगिकीकरण व नागरीकरण हे ज्येष्ठांच्या समस्या निर्मितीस कारणीभूत ठरत आहे.[४]

**४. दर्जाचे बदलते निकष:–**

दर्जाचे प्रामुख्याने दोन प्रकार मानले जातात. एक अर्जित दर्जा तर दुसरा अर्पित दर्जा. स्वतःच्या गुण कौशल्याने मिळवलेल्या दर्जास अर्जित आणि समाजाने दिलेल्या दर्जास अर्पित दर्जा असे म्हणतात. पूर्वी अर्पित दर्जास खूप महत्त्वाचे स्थान होते.[५] हा दर्जा वयाने मोठ्या व्यक्तींना दिला जात असे. म्हणजेच ज्येष्ठ नागरिकांना आदराचे स्थान होते. त्यांचा मान–सन्मान करणे हे परमकर्तव्य समजले जात होते. परंतु आधुनिक काळात वयापेक्षा गुणवत्तेला महत्त्व दिले गेले. म्हणजेच अर्पित दर्जाचे महत्त्व कमी होऊन अर्जित दर्जाला महत्त्व मिळाले. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांचे महत्त्व कमी होत गेले.[६] परिणामी ज्येष्ठ नागरिकांचा मान–सन्मान कमी झाला. ते दुर्लक्षित होऊ लागले. त्याचा परिणाम नागरिकांच्या सामाजिक आणि मानसिक स्थितीवर झाला. म्हणून ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या वाढू लागल्या. म्हणून दर्जाचे बदलते निकष हे सुद्धा ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या निर्मितीस कारणीभूत ठरत आहे.

**५. जोडीदाराचे निधन:–**

ज्येष्ठ नागरिकांना आपल्या जोडीदाराची गरज खूप मोठ्या प्रमाणात असते. परंतु ज्येष्ठ दांपत्यापैकी एखाद्या व्यक्तीचे आकस्मितरित्या किंवा अतिज्येष्ठतेमुळे निधन झाले तर मागे राहिलेली व्यक्ती एकाकी पडते. त्यामुळे त्यांच्या समस्यांमध्ये प्रचंड वाढ होते. ज्येष्ठ नागरिकांना या अवस्थेमध्ये खूप पैसा कमावणे, मौल्यवान वस्तू खरेदी करणे याची अपेक्षा नसते. तर त्यांना



Scanned by CamScanner

Special Issue-141 (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Aug. 2022 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139


आपल्या कुटुंबातील सदस्यांनी आपल्याशी प्रेमाने बोलावे, भावभावना समजून घ्यावी ही साधारण इच्छा असते. परंतु घरातील इतर सदस्य आपापल्या कामात व्यस्त असतात. जोडीदाराच्या मृत्यू झाला असेल तर तो ज्येष्ठ नागरिक आपलं मन मोकळं करू शकत नाही. आपला जीवनसाथी सोडून गेल्यामुळे जीवनाचा अर्थच संपला अशी भावना निर्माण होते. आपली काळजी कोण घेणार? आपण कोणासाठी जगायचे? असे अनेक प्रश्न त्याला पडतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकाचे मन दुःखी बनत जाते. त्याचा परिणाम शरीर तसेच मानसिकतेवर होतो. स्वभाव चिडचिडा बनतो. मन उदास राहते. जीवनातील आनंदाचे दिवस संपले आता दुःखच दुःख ही भावना निर्माण होते. तो आपल्या भावना कोणासमोर व्यक्त करू शकत नाही. त्यांना कोणी समजून घेत नाही. नाईलाजाने मनातल्या गोष्टी मनात ठेवूनच त्याला मृत्यूला सामोरे जावे लागते.[7] म्हणजेच ज्येष्ठ नागरिकांचा जोडीदार गेला की ते एकाकी पडतात. मग ते ग्रामीण भागातील असो की शहरी भागातील असोत. त्यांच्या समस्यामध्ये अधिक वाढ होते. म्हणजेच ज्येष्ठांच्या समस्या वाढीमागे जोडीदाराचे निधन हे एक महत्वाचे कारण ठरत आहे.

### ६. आर्थिक परावलंबनः–

तारुण्यामध्ये प्रत्येक व्यक्ती पैसे, संपत्ती कमवत असतो. परंतु जेव्हा तो ज्येष्ठ नागरिक बनतो तेव्हा त्याचे आर्थिक उत्पन्न बंद झालेले असते. तारुण्यामध्ये कमावलेल्या त्याच्या पैशावर घरातील मुले ताबा मिळवतात. परिणामी ज्येष्ठांना आर्थिक बाबतीत दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते. तो परावलंबी होतो. बऱ्याच जेष्ठ नागरिकांना व्यसनाची सवय असते. तंबाखु, पान, सुपारीसाठी त्यांच्याकडे पैसा नसतो. शिवाय देवदर्शन करण्यासाठी, पर्यटन स्थळे पाहण्यासाठी त्यांच्याकडे पैसा नसतो. ते आपल्या मुलांना, सुनेला पैसे मागतात त्यावेळी त्यांचा अपमान, उपेक्षा केली जाते.[8] ज्येष्ठांना अनेक शारीरिक त्रास होत असतात. त्याचे अनेक अवयव निकामी होत जातात. तेव्हा त्यांना योग्य उपचाराची गरज असते. ज्यामुळे होणारा त्रास कमी करता येईल. परंतु आर्थिक परावलंबनामुळे त्यांना उपचार घेणे शक्य होत नाही. म्हणून आर्थिक परावलंबन हेसुद्धा ज्येष्ठांच्या समस्या वाढीसाठी कारणीभूत ठरत आहे.

### ७. नोकरी करणाऱ्या महिलांचे वाढते प्रमाणः–

पूर्वीच्या काळी घरातील पुरुष नोकरी किंवा व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर पडत असत. परंतु आजच्या परिस्थितीमध्ये महिलांनासुद्धा मोठ्या प्रमाणात नोकरी–व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर पडावे लागत आहे. त्यामुळे ज्येष्ठांकडे लक्ष देण्यासाठी कोणीच नाही. मुलांची किंवा सुनेची इच्छा असली तरीसुद्धा ते त्यांना वेळ देऊ शकत नाहीत. घरातील मुले अभ्यासामुळे ते जास्त वेळ देऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांची मानसिक कुचंबणा होते. आपल्याला कोणीच वेळ देत नाही याचे त्यांना वाईट वाटते. त्यांना या बदललेल्या परिस्थितीशी जुळवून घेणे अशक्य होते. याशिवाय घरातील सर्व नोकरी करतात त्यामुळे ज्येष्ठांनीही घरातील कामे करावीत असे कुटुंबातील सदस्यांना वाटते.[9] त्याचबरोबर ज्येष्ठांनी खर्च कमी करावा. पैसा खर्च करणे टाळावे. मुलांची व सूनेची सेवा करावी, त्यांना लागणाऱ्या वस्तू, साहित्य चांगल्या पद्धतीने तयार ठेवावे. सर्व संपत्ती मुलगा व सुनेच्या नावे असावी. त्यांनीच सर्व आर्थिक व्यवहार पाहावे, असे वाटल्यामुळे मुलगा–सून आणि ज्येष्ठ यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो. म्हणून असे म्हणतात की, ज्या कुटुंबातील स्त्रिया




Scanned by CamScanner

| Special Issue-141 (Indexed) Aug. 2022 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

नोकरी–व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर पडतात त्या कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या वाढत जातात.

**८. राहत्या घरांची कमतरता:–**

वाढत्या लोकसंख्येचा देश अशी आपल्या देशाची ओळख आहे. ग्रामीण भागातून नागरी भागाकडे होणारे स्थलांतर चालूच आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. ग्रामीण भागात जागेची कमतरता नसली तरी पक्क्या घरांची कमतरता मात्र आहे. नागरी भागामध्ये जागेची कमतरता असल्यामुळे छोट्या छोट्या खोल्या तयार केल्या जातात. त्यामध्ये घरातील सर्व सदस्य व ज्येष्ठ नागरिकांना राहणे अशक्य होते. अशा परिस्थितीत ज्येष्ठांना एकत्रित राहण्याची समस्या निर्माण झालेली दिसून येते.[१०] ज्येष्ठ नागरिक स्वतःसाठी नवीन घर घेऊ शकत नाहीत. म्हणूनच ज्येष्ठ नागरिकांच्या समोर ही एक खूप मोठी व गंभीर समस्या बनलेली आहे.

**९. ग्रामीण समुदायातील परिवर्तन:–**

समाज हा परिवर्तनशील असतो. त्यामध्ये सातत्याने परिवर्तन होत असते. या परिवर्तनास ग्रामीण समुदायही अपवाद नाही. पूर्वी ग्रामीण समुदायांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना सर्वोच्च स्थान व दर्जा होता. परंतु ग्रामीण जीवनात सातत्याने परिवर्तन होत गेले. ग्रामीण भागातील कृषी उद्योग, आर्थिक बाबी यामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा विकास झाला. मोबाईल, इंटरनेट, सॅटेलाइट, हवामान विभागाचे संदेश यामुळे प्रचंड बदल झाला. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांचे ज्ञान अपुरे पडू लागले. त्यांचे महत्त्व कमी झाले. नवीन पिढीच्या हातामध्ये नवीन सूत्र गेली.[११] नवीन पिढी त्यांच्या अनुभवाला, ज्ञानाला कमी महत्त्व देऊन तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात करू लागली. परिणामी ज्येष्ठाचे महत्त्व कमी होऊन त्यांच्याकडे तरुणपिढी दुर्लक्ष करू लागली. याचबरोबर नातीगोती, राहणीमान, औपचारिकता–अनौपचारिकता यामध्ये प्रचंड बदल झाला. हे परिवर्तन सकारात्मक असले तरी त्याचा सर्वाधिक नकारात्मक परिणाम ज्येष्ठ नागरिकांवर झाला. या परिवर्तनामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांमध्ये अभूतपूर्व वाढ झाली.

**१०. नैतिक मूल्यांचा ऱ्हास:–**

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये पूर्वी नैतिक मूल्य खूप महत्त्वाची मानली जात असत. त्यांना मान–सन्मान देणे, अभिवादन करणे, त्यांचे आशीर्वाद घेणे अत्यंत महत्त्वाचे मानले जात होते. यामुळे ज्येष्ठांचा समाजातील दर्जा सर्वोच्च होता. परंतु सद्यस्थितीमध्ये नैतिक मूल्य पाठीमागे पडून नवीन सामाजिक मूल्यांचा विकास झाला. यामध्ये स्वातंत्र्य, समता, न्याय इत्यादी नवीन मूल्यांना मान्यता मिळाली. व्यक्तीचा दर्जा त्यांचे कर्तृत्व, शिक्षण, प्रवीण्य व कौशल्यावर ठरू लागला. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना हा नवीन दर्जा मिळविणे अशक्य होऊ लागले. म्हणून त्यांचा दर्जा कमी झाला. पूर्वी धर्म, वंश, जात, लिंग इत्यादी आधारावर मिळणारा दर्जा बंद झाला. परिणामी ज्येष्ठांना नवीन सामाजिक मूल्याप्रमाणे दर्जा मिळणे अवघड झाले. नवीन मूल्यांच्या प्रभावामुळे पारपारिक मूल्य व्यवस्थेत ज्येष्ठांना बाजूला टाकले गेले. त्यामुळे त्यांची मानसिक कुचंबणा झाली. समाज त्यांच्याकडे दुर्लक्ष करु लागला. म्हणून ज्येष्ठांच्या समस्यामध्ये भर पडली.[१२]

**निष्कर्ष:–**



Scanned by CamScanner

संशोधन कार्यातून काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष निघाले आहेत ते खालील प्रमाणे:–

१. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या वाढीमागे अनेक घटक जबाबदार आहेत.
२. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे ज्येष्ठांच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे.
३. पाश्चात्य संस्कृतीच्या अनुकरणामुळे ज्येष्ठांचा दर्जा संपुष्टात येत आहे.
४. नवीन पिढी ज्येष्ठांकडे दुर्लक्ष करत आहे.
५. ज्येष्ठांच्या समस्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.
६. नैतिक मूल्यांच्या ऱ्हासामुळे ज्येष्ठांचा दर्जा ढासाळत आहे.

**संदर्भ सूची:–**

1 शेंडे कृष्णा : समाज कल्याण आणि सामाजिक अधिनियम, क्रिएटिव्ह पब्लिकेशन, नांदेड. पृ. क्र. १३३
2 लोटे रा. ज. : सामाजिक समस्या, पिंपळापुरे अण्ड कं.पब्लिशर्स, नागपूर. पृ. क्र. १००
3 शेंडे कृष्णा : सामाजिक कल्याण आणि सामाजिक अधिनियम, क्रिएटिव्ह पब्लिकेशन, नांदेड. पृ. क्र १३३
4 मायी सुनील : भारतीय सामाजिक समस्या, अंशुल पब्लिकेशन,नागपुर. पृ. क्र. १००
5 डोईफोडे ज्योती : समाजशास्त्रीय संकल्पना व व्याप्ती, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगापुरा, औरंगाबाद. पृ. क्र. २४१, २४२
6 खडसे भा. की. : भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई. पृ. क्र.१४६, १५०
7 माय सुनील : भारतीय सामाजिक समस्या, अंशुल पब्लिकेशन, नागपुर. पृ. क्र.१५०
8 मनवर डी. एस. : भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, अरुणा प्रकाशन, लातूर.पृ. क्र.१५०
9 आगलावे प्रदीप : भारतीय समाज संरचना आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. पृ. क्र. २१५
10 शेंडे कृष्णा : समाज कल्याण आणि सामाजिक अधिनियम, क्रिएटिव्ह पब्लिकेशन, नांदेड. पृ. क्र.१३५
11 लोटे रा. ज. : सामाजिक समस्या, पिंपळापुरे अण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर. पृ. क्र.१००
12 आगलावे प्रदीप : भारतीय समाज संरचना आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.पृ. क्र. २१५



Scanned by CamScanner